**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १४९ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.एन.यु. भगत,
माजी उपजिल्हाधिकारी,
बळवंत कॉलनी, पो.गांधीनगर, जि.अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद अकोला, जि.अकोला

**२**. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, कैलास विदयालय सिंदखेड,
ता.बार्शीटाकळी जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १५/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.एन.यु. भगत हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला श्री.एस.एच. वाकोडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कैलास विदयालय सिंदखेड श्री.डि.एम. पवार हे हजर आहेत.

अर्जदार यांना हया आयोगासमोर काही माहिती देण्यात आली तसेच ठरावाच्या प्रति देण्यात आल्या. ठरावाच्या प्रति व ठरावासाठी लागणा-या कागदपत्राची मागणी केली असता जन माहिती अधिकारी श्री.पवार यांचेकडुन मागणीनुसार जी कागदपत्रे अर्जदाराला देण्यात आली त्या शिवाय दुसरे कुठलेही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना मिळाले नाही व तसे लेखी देण्यास ते तयार आहेत. तरी, जन माहिती अधिकारी यांनी तसे लेखी अर्जदारास अर्जदाराचे पत्त्यावर पंजीबध्द डाकेने कळवावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १६४ / २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.सईद बेग रशीद बेग,
मु.पो. पेढी (ई), ता.महागांव, जि.यवतमाळ.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम -२),
जिल्हा परिषद, यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १५/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.सईद बेग रशीद बेग हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रभारी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम-२, यवतमाळ श्री.डि.एम. वंजारी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, जि.प. बांधकाम-२, यवतमाळ श्री.डि.वाय. डाखोरे हे हजर आहेत.

अर्जदाराने प्रपत्र 'अ' दिनांक २८/११/२००८ नुसार जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पुसद यांचेकडुन माहिती मागितली. सदरची माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे कडे अपिल दाखल केले. सदरच्या प्रकरणात अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १६/०२/२००९ ला आदेश पारीत केला व सुनावणी दरम्यान अर्जदार हे हजर होते तसेच माहिती अधिकारी यांचे वतीने श्री.पुजारी, अधिक्षक, बांधकाम विभाग क्र.२ व श्री.एस.एम. नाईक, सहाय्यक माहिती अधिकारी हे उपस्थित होते. सुनावणी दरम्यान उत्तरवादी व अपिलकर्ता यांचा जबाब ऐकुन घेण्यात आला. तेव्हा अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती मिळाली नाही असे सांगितले व म्हणुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असा आदेश पारित केला की, मुद्दा क्र.१ ते ८ पांदनरस्त्याची व इतर माहिती संबंधिताकडुन उपलब्ध करुन अपिलकर्ता यांना देण्याचा आदेश देण्यात आला व माहिती देण्यास विलंब करणारे कर्मचारी यांना समज देण्यात यावी. सदरचा आदेश दिनांक १६/०२/२००९ रोजी पारित झाल्यानंतर आज दिड वर्षाचे वर कालावधी उलटुनही गेला आहे व व्दितीय अपिलाची सुनावणी पर्यंत सुध्दा अर्जदाराला संपुर्ण माहिती देण्यात आली नाही. श्री.नाईक, शाखा अभियंता यांचे अखत्यारीत सदर माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी ही माहिती देवु शकले नाही. श्री.नाईक, शाखा अभियंता हे दिनांक १६/०२/२००९ ला सुध्दा हजर होते.

ही बाब लक्षात घेता जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेविरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवा विषयक नियमांचा भंग केल्याच्या कारणावरुन शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते तसेच अर्जदाराल झालेल्या आर्थिक, मानसिक व शारिरीक मनस्तापाबद्दल ५०००/- रु. नुकसान भरपाई देण्यात यावी व सदरची नुकसान भरपाई सार्वजनिक प्राधिकरणाने सोसायची किंवा

संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडुन वसुल करायची या बाबत कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे स्तरावर योग्य तो आदेश पारित करावा व सदरची रक्कम आजपासुन ६ आठवडयाच्या आत अर्जदाराला देण्यात यावी व तसा अहवाल या आयोगास सादर करावा. तसेच अर्जदाराला माहिती पुर्ण देण्यात आलेली आहे. माहितीस झालेल्या विलंबाबाबत श्री.नाईक, शाखा अभियंता, बांधकाम विभाग, पुसद हे जबाबदार असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते त्यामुळे त्यांचेकडुन सदरची माहिती पुन्हा दिनांक २५/११/२०१० रोजी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन दयावी व सदरची माहिती विनाशुल्क पुरवावी. तसेच संबंधित शाखा अभियंता यांनी माहिती उशिरा का पुरविली त्याबाबत त्यांचे लेखी निवेदन घ्यावे व योग्य तो आदेश पारित करावा. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार ९० दिवसात व्दितीय अपिल हया आयोगासमोर करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १६५ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.पंडित कन्हैयालाल बनवारीलाल तिवारी,
(सामाजिक कार्यकर्ता), रेल्वेस्टेशन विभाग,
मरीमाता मंदिराजवळ मुर्तीजापुर, जि.अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, शहर विभाग,
विदयुत भवन, रतनलाल प्लॉट,
महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी शाखा, अकोला.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादीत,
शाखा कार्यालय अकोला,
अकोला शहर क्र.३, ता.जि. अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १५/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.पंडित कन्हैयालाल बनवारीलाल तिवारी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी शहर विभाग, अकोला श्री.एन.एन. वर्मा हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे ॲड.सुनिल काटे, अकोला हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी, शहर उपविभाग क्र.३ अकोला श्री.एस.एस. ताडे हे हजर आहेत.

अर्जदार हे मुर्तीजापुर येथील मरीमाता मंदिरा जवळ रेल्वे स्टेशन विभाग येथे राहतात. त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, शहर विभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, अकोला यांचेकडे अर्ज करुन प्रपत्र 'अ' नुसार दिनांक १२/०१/२००९ ला माहिती मागितली. मागितलेली माहिती जास्त प्रमाणात असल्यामुळे अर्जदाराला ५ फेब्रुवारी २००९ ला पत्र देवुन माहितीसाठी योग्य तो भरणा करण्याचे अर्जदारास कळविले. अर्जदाराने पैसे न भरल्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली नाही. परंतु प्रथम अपिलात दिनांक ०९/०४/२००९ रोजी सुनावणी दरम्यान अर्जदाराने माहिती ही फक्त पोल क्र.८०/१ बाबत मागितल्याचे म्हटले आहे व त्याचे निरीक्षण देण्याचे कबुल केले परंतु अर्जदाराने निरीक्षण घेतले नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अशी चर्चा झाली नाही व निरीक्षणाबद्दल सुध्दा काही पत्र व्यवहार झाला नाही. तरी, सदर प्रकरणात अर्जदार हे दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही हया बाबत अनिश्चितता कायम आहे. अर्जदाराचे म्हणण्यानुसार अर्जदाराचे दिनांक १२/०७/२००६ चे राशन कार्ड आहे व त्यावरुन अर्जदाराचे म्हणण्यानुसार अर्जदार हा दारिद्रय रेषेखालील आहे. तरी, ही बाब निश्चित करण्याचे दृष्टिने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापुर व मुख्याधिकारी, नगर परिषद, मुर्तीजापुर यांनी अर्जदार हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे किंवा

नाही तसेच अर्जदाराचे नांव सध्या प्रचलित असलेल्या यादीमध्ये आहे किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसात उपकार्यकारी अभियंता यांना त्यांचे स्तरावर लेखी स्वरुपात कळवावे. अर्जदार दारिद्रय रेषेखाली आहे ही बाब गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी कळविल्यास अर्जदाराचे प्रथम अपिलात सुनावणी घेवुन अर्जदाराचे लेखी म्हणणे ऐकुन नियमानुसार योग्य तो निर्णय घ्यावा. जर अर्जदार दारिद्रय रेषेखालील नाही ही बाब सिध्द झाल्यास अर्जदाराला मागितलेले निरीक्षण दयावे व अर्जदाराने मागितलेली माहिती नियमानुसार पुरवावी व सदरची माहिती ६ आठवडयाच्या आंत दयावी. त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार ९० दिवसात व्दितीय अपिल या आयोगासमोर दाखल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापुर, जि.अकोला,
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, मुर्तीजापुर, जि.अकोला.

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १६३ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. विष्णु पंडीतराव आमटे,
मु.पो.भिवगांव बु. ता.देऊळगांव राजा,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
देऊळगांव राजा, जि.बुलडाणा.

२. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भिवगांव बु.,
ता.देऊळगांव राजा, जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक १५/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैर हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती, देऊळगांवराजा श्री.डि.ओ. घुगे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गटग्रामपंचायत भिवगांव बु. श्री.आर.एस. जाधव हे हजर आहेत.

उत्तरवादी यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला दिनांक ०५/१२/२००९ रोजी माहिती देण्यात आली आहे. अर्जदाराने दिनांक २८/०१/२०१० नुसार व्दितीय अपिल दाखल केले व वारंवार पाठपुरावा करुनही माहिती दिली नाही अशी तक्रार आहे. सदर प्रकरणात अर्जदाराने दिनांक १६/१०/२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्यात सुध्दा अर्जदाराने माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याची तक्रार केलेली आहे. हया प्रकरणात प्रथम अपिल निकाली काढण्यात आले नाही.

तरी, सदर प्रकरणात आजपासुन ४ आठवडयाच्या आत अपिलाची तारीख निश्चित करुन त्यात अर्जदाराचे म्हणणे ऐकुन अर्जदाराने समाधान करावे. अर्जदाराला माहिती दिली किंवा नाही याची शहानिशा करावी. गटविकास अधिकारी यांनी अर्जदार यांना समक्ष माहिती उपलब्ध करुन दयावी तसेच अर्जदाराने सचिव यांना दिनांक ०५/१२/२००९ रोजी असे लिहुन दिले की, मागितलेली माहिती मिळाली. त्यात जरी लेखी लिहुन दिले तरी अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करुन वारंवार पाठपुरावा करुन माहिती दिली नाही.

हया सर्व बाबी लक्षात घेवुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलात योग्य तो निर्णय घेवुन ४ आठवडयाचे आंत आदेश पारित करण्यात यावा. आदेश पारित करुन अर्जदाराला प्रत उपलब्ध करुन दयावी व त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास ते त्यानंतर ९० दिवसात व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १६२/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. एल.के. कुळकर्णी,
रा.लांडे ले-आऊट, बुलडाणा, जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती,
जि.अमरावती

**२.** जन माहिती अधिकारी तथा
अंतर्गत विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, अमरावती, जि.अमरावती

**(आदेश पारीत दिनांक १५/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. एल.के. कुळकर्णी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे तर्फे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदुर रेल्वे, श्रीमती के.पी. धोपे हया हजर आहेत.

सदर प्रकरणात प्रथम अपिल घेण्यात आले परंतु अर्जदाराला चौकशी अहवाल प्राप्त नसल्यामुळे अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती धोपे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदुर रेल्वे यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर प्रकरणात सुनावणी घेवुन असे निदर्शनास आले की, अर्जदाराला दिनांक १७/०६/२००९ रोजी माहिती दिली आहे.

अर्जदाराचे महामहिम राष्ट्रपती यांचेकडे केलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०६/०७/२००९ ला विभागीय सहाय्यक निबंधक यांचेकडे व त्यांनी ते जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांचेकडे दिनांक १६/०७/२००९ या पत्रान्वये चौकशी करुन अहवाल मागितला परंतु सदर चौकशी अहवाल मिळाला नसल्यामुळे माहिती पुरविण्यात आली नाही. दिनांक २०/०५/२००९ ला अवर सचिव यांनी सुध्दा संबंधित कार्यालयाने कार्यवाही करण्याबाबत आदेशीत करण्यात आले.

वरील बाबी लक्षात घेता दिनांक २३/११/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराचे प्रथम अपिल प्रपत्र 'ब'दिनांक २१/११/२००९ च्या अपिलाची पुन्हा सुनावणी देवुन सदर प्रकरणात त्यानंतर ८ दिवसाचे आंत आदेश देवुन निकाली काढावे व त्याची प्रत अर्जदाराला पुरविण्यात यावी. सदर प्रकरणात प्रथमअपिलीय अधिकारी यांचा दिनांक २९/१२/२००९ रोजीचा दिलेला आदेश रद्दबातल करण्यात आला आहे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १६१ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.प्रकाश दशरथ कुटे,
मु.खैरव, पो.गांगलगांव, ता.चिखली,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, पुर्व माध्यमिक विभाग,
शिक्षणाधिकारी कार्यालय,
जयस्तंभ चौक, बुलडाणा, ता.जि. बुलडाणा

**२**. जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधिक्षक, सहकार विदयामंदिर,
विदयानगरी, चिखली रोड, बुलडाणा

३) माहिती अधिकारी, शिक्षण विभाग,
माध्यमिक,जिल्हा परिषद, बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक १५/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.प्रकाश दशरथ कुटे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे तर्फे कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.), जि.प. बुलडाणा श्री.एस.ए. सोनुने हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, सहकार विद्यामंदिर, बुलडाणा तर्फे शाखा व्यवस्थापक, सहकार विद्या मंदिर, अमरावती श्री.प्रशांत संगवई हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक १२/१०/२००९ रोजी प्रपत्र प्रपत्र 'अ' नुसार शिक्षणाधिकारी, पुर्व माध्यमिक विभाग, बुलडाणा यांना माहिती मागितली. सदर प्रकरणात माहिती अधिकारी, सहकार विद्यामंदिर, ज्युनिअर कॉलेज यांनी अर्जदाराला दिनांक १२/११/२००९ रोजी असे कळविले की, सहकार विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ही कायम विनाअनुदानीत संस्था असुन कोणत्याही प्रकारचे शासनाचे अनुदान किंवा मदत घेत नसल्यामुळे त्यांना माहिती देणे बंधनकारक नाही. सदर प्रकरणात ही बाब सत्य असलीतरी सदरची संस्था ही बुलडाणा, अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटी संस्थे मार्फत चालविण्यात येत नाही.

तरी, हया प्रकरणात सदरची संस्थेच्या बॉयलॉज मध्ये शैक्षणिक संस्था चालविणे ही बाब येते किंवा नाही हया बाबत आयोग साशंक आहे. तरी, हया बाबत परवानगी कशी देण्यात आली याची चौकशी सचिव स्तरावर करणे आवश्यक आहे. तरी, सचिव, शालेय शिक्षण विभाग, मुंबई यांनी हया प्रकरणात बुलडाणा, अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटी संस्थेला जरी चालविण्याची परवानगी दिली हे कक्ष अधिकारी यांचे वतिने सांगण्यात आले. तरी ही बाब नियमानुसार आहे किंवा नाही याची शहानिशा संबंधित संस्थेचे म्हणणे ऐकुन घेवुन योग्य तो निर्णय घ्यावा व हया आयोगास तसे २ महिन्याच्या आत

कळवावे.  सदर प्रकरणात अर्जदाराने केलेला अर्ज हा माहितीच्या अधिकारात बसत नाही व हया संबंधिचा मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ, नागपुर यांनी अशा संस्थेला कुठलीही माहिती अधिकार लागत नाही ही बाब सदर निकालात स्पष्ट केली असल्यामुळे अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**